परभणी जिल्हा परिषद (जिल्हा परभणी) नवीन प्रशासकीय इमारतीकरिता फर्निचर व इतर उपकामांस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः जिपई-२०१८/प्र.क्र.५६/बांधकाम-४

५ वा मजला, मर्झबान पथ, २५ बांधकाम भवन,

फोर्ट, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१

तारीख : ०५ सप्टेंबर, २०१९

वाचा :-

१) **शासन निर्णय क्रमांकः** ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक जिपई-२०१०/प्र.क्र.३४/पंरा-७, दिनांक १३ जुलै, २०११.

२) **अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचे पत्र क्रमांकः** जि.प./बांध/ताशा/९११/१८, दिनांक ०१ मार्च, २०१८.

३) **अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचे पत्र क्रमांकः** जिप.बांध.ताशा-१.कावि २७०६/१८, दिनांक १३ जून, २०१८.

४) **अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचे पत्र क्रमांकः** जि.प./बांध/ताशा-१/कावि-१५१०/२०१९, दिनांक २५ जुलै, २०१९.

प्रस्तावना :-

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी वाचा मधील अनुक्रमांक २ ते ४ येथील पत्रांन्वये परभणी जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीकरिता फर्निचर व इतर उपकामांस प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली आहे.

०२. परभणी जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास वाचा मधील अनुक्रमांक १ येथील दिनांक १३ जुलै, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये रू.९६८.४८ लक्ष एवढ्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. परभणी जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले असून प्रकल्प अंतिमत: पुर्ण होण्यासाठी फर्निचर व इतर सुविधांची आवश्यकता आहे. याकरीता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी फर्निचर व इतर उपकामांकरिता रू.४,९८,८३,०००/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक सादर केले आहे. सदर अंदाजपत्रक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड व कार्यकारी अभियंता (बां.), जिल्हा परिषद, परभणी यांनी साक्षांकीत केले आहे.

०३. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या तांत्रिक छाननी अंती, परभणी जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीकरिता

फर्निचर व इतर उपकामांस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत रूपये ४९८.८३ लक्ष इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

परभणी जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीकरिता फर्निचर व इतर उपकामांच्या बाबींच्या एकूण रक्कम रुपये ४,९८,८३,०००/-(रूपये चार कोटी अठ्याण्णव लक्ष त्र्याऐंशी हजार फक्त) इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या कामांस पुढील अटींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) परभणी जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीकरिता, शासन निर्णय, सा.बां.वि.क्र.सीएटी-१०९६/प्र.क्र.१७२/इमारती-२, दि.७.१.२००४ नुसार विहीत केलेल्या नोंदणीकृत फर्निचर/मॉड्युलर फर्निचर उत्पादक अथवा पुरवठादार/अंतर्गत सजावटकार यांच्याकडून विहीत कार्यपध्दती अनुसरुन फर्निचरचे काम करून घेणे बंधनकारक राहील.

२) या प्रकरणी सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली जाणार नसल्याने, मंजूर प्रशासकीय मान्यता किंमतीतच काम पूर्ण करण्याची संबधित कार्यकारी अभियंता (बांध.), जिल्हा परिषद यांनी दक्षता घ्यावी.

३) या कामी प्रशासकीय मान्यता किंमतीपेक्षा अधिक खर्च झाल्यास तो पंचायत समिती/जिल्हा परिषदेने सोसावा.

४) प्रस्तुतचे काम हाती घेतल्यापासून जास्तीत जास्त एका वर्षात पूर्ण होईल, असे संबधित कार्यकारी अभियंता (बांध.), जिल्हा परिषद यांनी नियोजन करावे.

५) प्रस्तुत कामाचा त्रैमासिक प्रगती अहवाल वेळीच शासनास पाठविण्याची संबधित कार्यकारी अभियंता (बांध.) जि.प. यांनी दक्षता घ्यावी.

०२. परभणी जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीकरिता फर्निचर व इतर उपकामांच्या अंदाजपत्रकाचा सर्वसाधारण गोषवारा पुढील प्रमाणे आहे.

GENRAL ABSTRACT FOR PARBHANI Z.P. FURNITURE & SUB WORK		
Sr.No.	**Description of item**	**Cost In Rs.**
1	Cost of Furniture Work	40162972.00
2	Cost of False Ceiling Work	4303738.00
3	Cost of Painting Work	1088784.00
4	Total (1) + (2) + (3)	45555494.00
5	Add for Corporation Areas 5 %	2277774.70
6	Add for Architectural Fee 4.5 %	2049997.23
	Total (4) + (5) + (6)	**49883265.93**
	Says Rs.	**4,98,83,000.00**

०३. उपरोक्त बांधकामासाठी संबधित सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर अनुदान स्वरुपात टप्प्या-टप्प्याने निधी उपलब्ध करून दिला जाणार असून, तो उपलब्धतेनुसार अर्थसंकल्प वितरण प्रणाली (BDS) द्वारे वितरीत करण्यांत येईल. यावरील खर्च "२५१५-इतर ग्रामीण विकास कार्यक्रम १०१, पंचायती राज ३१ सहाय्यक अनुदाने (०१) (०३) जिल्हा परिषदांच्या इमारती बांधकामासाठी जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने (२५१५ ००५३) " या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

०४. प्रस्तुत कामाची माहिती कंस्ट्रक्शन ट्रॅकर प्रणालीवर अद्ययावत करावी.

०५. प्रस्तुतचा शासन निर्णय वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका,१९७८ भाग पहिला, उप विभाग-पाच, अ.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९०३१७०९०३७७२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAGHUNATH ANNASAHEB NAGARGOJE

Digitally signed by RAGHUNATH ANNASAHEB NAGARGOJE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=decff3a81eacee2237c8c2d29460e7c459d9f7baaab677f7578d952747d49ab2, postalCode=400001, street=RURAL DEVELOPMENT DEPT,BANDHKAM BHAVAN,25MARZBAN ROAD,FORT,MUMBAI, serialNumber=d404eac17c41303f055a321c8b78aa06691d96f89d2b59532f46b0d468148ae1, ou=RURAL DEVELOPMENT DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAGHUNATH ANNASAHEB NAGARGOJE
Date: 2019.09.05 16:00:24 +05'30'

(र. आ. नागरगोजे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा.विरोधी पक्षनेता विधानसभा/विधानपरिषद.
२) विभागीय आयुक्त, औरंगाबाद, विभाग औरंगाबाद.
३) महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२, नागपूर.
४) मुख्य अभियंता, प्र.मं.ग्रा.स.यो., मध्यवर्ती इमारत, पुणे.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी.
६) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी.
७) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी.
८) कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, परभणी.
९) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा परभणी.
१०) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
११) उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
१२) जिल्हा लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, परभणी.
13) निवडनस्ती, कार्यासन बांधकाम-४, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.